पुढारी

# महिलांच्या चेहऱ्यावरील आनंद हेच विठ्ठलाचे दर्शन

## **रूपाली चाकणकर :** फलटणमध्ये 'आरोग्य वारी' अभियानाचा शुभारंभ

**फलटण : पुढारी वृत्तसेवा**

आषाढी वारीच्या निमित्ताने वारकरी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून दाखल होत असतात. यात महिलांची संख्याही लक्षणीय असते. स्वतः वारीत सहभागी होऊन महिलांच्या अडचणी जवळून पाहिल्या आणि आयोगाच्या माध्यमातून आरोग्य वारी अभियान हा उपक्रम राबवण्याची संधी मिळाली. हे करत असताना माझ्या वारकरी महिला भगिनींच्या चेहऱ्यावरील आनंद हेच माझ्या विठ्ठलाचे दर्शन असल्याचे मत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ.रूपाली चाकणकर यांनी व्यक्त केले.



**फलटण : आरोग्य वारी उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी मार्गदर्शन करताना रूपाली चाकणकर. व्यासपीठावर आ. दीपक चव्हाण, संजीवराजे निंबाळकर व इतर.**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने आषाढी वारी कालावधीमध्ये वारकरी महिलांना सुरक्षा आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या 'आरोग्य वारी अभियाना'चा फलटण येथे शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी आ. दीपक चव्हाण, जि.प.चे माजी अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, प्रांताधिकारी सचिन ढोले, प्रांताधिकारी राजेंद्र जाधव, पोलिस उपअधीक्षक राहुल धस, तहसीलदार समीर यादव, तहसीलदार अभिजित पाटील, नगरपालिका मुख्याधिकारी संजय गायकवाड उपस्थित होते.

चाकणकर म्हणाल्या, राज्यातील गृह खात्यातील यंत्रणा सक्षम करण्याची गरज आहे. अनेक महिला व मुली बेपत्ता आहेत. महिला व मुलींना नोकरीचे आमिष दाखवून बाहेर गावी नेऊन त्यांची फसवणूक केली जाते. शासनाने महिलांच्या सुरक्षिततेसाठी कठोर पावले उचलावीत. वारीमध्ये अथवा इतर ठिकाणी सुद्धा कोणत्याही महिलेला कुठेही त्रास झाला; कोणताही नराधम हा महिलांना त्रास देत असेल तर त्यांनी तातडीने महिला हेल्प लाईन नंबर ११२ व १०९१ याद्वारे संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी आ. दीपक चव्हाण व संजीवराजे नाईक निंबाळकर यांनी मनोगत व्यक्त केले.